# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
# Maharashtra University of Health Sciences, Nashik

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४

Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

EPABX : 0253-2539100-300, Fax : 0253-2539171, Phone : 0253-2539173

E-mail : sw@muhsnashik.com Web.: www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** पीएच.डी **Dr. Kashinath D. Garkal** Ph.D

संचालक - विद्यार्थी कल्याण **Director – Students' Welfare**


*All correspondence be addressed to the Registrar.*

मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/७५७७/१२ दि.२४/०७/२०१२

प्रति,

अधिष्ठाता / प्राचार्य

एसएसपीएमस् कॉलेज ऑफ नर्सिंग बार्शी,

सोलापुर

**विषय : पुस्तक पेढी योजनेसाठी अनुदानाची रक्कम पाठविणेबाबत...**

**संदर्भ : आपले पत्र क्र.** CON/SSPM/394/2012 दि. 28/07/2012

महोदय / महोदया,

वर्ष २०११-१२ साठी विद्यापीठाने लागू केलेल्या पुस्तक पेढी योजनेसाठीच प्रस्ताव विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांकडून मागविण्यात आले आहेत. आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भीय पत्राव्दारे प्राप्त झालेला आहे. योजनेच्या अटी व शर्ती तसेच विद्यापीठाच्या प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रस्तावांची छाननी केल्यानंतर सदर योजनेचे अनुदान मिळणेकरीता आपल्या महाविद्यालयाचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

त्या अनुषंगाने योजने अंतर्गत विद्यापीठाचे अनुदान रु. २०,०००/- इतक्या रक्कमेचा बँक ऑफ महाराष्ट्राचा **दि.१८/०७/२०१२ रोजीचा धनादेश क्र.** २८९९४९ पत्रासोबत जोडून पाठवित आहात. सदर अनुदानातून महाविद्यालयाने विद्याशाखानिहाय महागडी पुस्तके खरेदी करुन, यापूर्वी पाठविण्यात आलेल्या योजना पुस्तिकेत नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार अर्थिक दृष्टया दुर्बल /गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. तसेच महाविद्यालयाने योजनेअंतर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी खालील नमुद केलेल्या सर्व कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन सदर पत्राच्या दिनांकापासुन दोन महिन्याच्या आत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे.

**पुस्तक पेढी योजनेचे समायोजन करण्यासाठी पुढील कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

१) नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी केलेल्या, पुस्तक संचाची मुळ दयके (Original Bills) व सुट दिल्याचा तपशिल.

8/8/12

M. CON
INWARD No. 12
DATE 06.08.12

H:\covering letter schemes\book bank DD forward to College.doc

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, कमीत कमी तीन नोंदणीकृत पुस्ताकालयातून मागविण्यात आलेल्या पुस्तकांच्या यादीप्रमाणे त्यांच्या दरपत्रकांची ( Quotations ) प्रत्येकी एक प्रमाणे तीन मुळ प्रति.

३) अनुदान रक्कमेच्या जमा खर्चाचा हिशोब सनदी लेखापालांकडून (Chartered Accountant) परिक्षण केलेला मुळ अहवाल/प्रमाणपत्र.

४) सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील, सनदी लेखापालांचे मुळ उपयोगिता प्रमाणपत्र (Original Utilisation Certificate )

५) "सदर पुस्तके विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने उपयुक्त असून त्यांचे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल " असे अधिष्ठाता /प्राचार्य यांचे प्रमाणपत्र.

६) सनदी लेखापालांची मानधनाची रक्कम महाविद्यालयाने अदा करावी.

७) योजने अंतर्गत महाविद्यालयाने पुस्तके खरेदी न केल्यास सदर अनुदान रक्कम रु. २०,०० त्वरीत विद्यापीठास परत करावी अन्यथा सदर रक्कमेवर बँकेच्या प्रचलीत व्याज दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

८) पुस्तकपेढी योजना राबविली नसल्यास किंवा योजनेचे अनुदान शिल्लक राहिल्यास सदर अनुदानाची रक्कम **"कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक"** यांच्या नाव नाशिक येथे देय असलेल्या धनाकर्षाव्दारे विद्यापीठास परत करावी.

९) शिल्लक राहिलेली रक्कम विद्यापीठास परत करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही. सदर खर्च महाविद्यालयाने सोसावा.

**<u>पुस्तक पेढी योजनेची अंमलबजावणी करतांना पुढील सुचनांची नोंद घ्यावी.</u>**

१) अनुदानाच्या रक्कमेतून तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनानुसार विद्याशाखानिहाय आवश्यक असलेल्या पुस्तकांचे संच नोंदणीकृत पुस्तकालयातून खरेदी करण्यात यावे व खरेदी करण्यात आलेल्या मुळ बिलामध्ये पुस्तकालयाचे नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत ), पुस्तकाच्या किंमती व त्यावर सुट दिल्याचा तपशिल, पुस्तकालयाच्या मालकाचा सही व शिक्का यांचा स्पष्ट समावेश असणे आवश्यक आहे.

२) पुस्तके खरेदी करण्यासाठी, पुस्तकालयांकडून दरपत्रके (Quotations) मार्गावताना पुस्तकालयाचे नाव, दुरध्वनी क्र. (एस.टी.डी. कोडसहीत ), पुस्तकाच्या किंमती व त्यावर सुट दिल्याचा तपशिल, पुस्तकालयाच्या मालकाची सही व शिक्का यांचा स्पष्ट समावेश असणे आवश्यक आहे.

३) खरेदी केलेली पुस्तके महाविद्यालयाच्या ग्रंथालयात ठेवावी व सदर पुस्तके गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी वाटप करावी. योजनेचा लाभ देण्यासाठी महाविद्यालयाने, उपलब्ध पुस्तक संचाच्या प्रमाणात विद्यार्थीसंख्या निश्चित करुन त्याप्रमाणे पुस्तकांचे वाटप करावे.

४) सदर अनुदान महाविद्यालयास तीन वर्षाकरीता एकदाच वाटप करण्यात येत असल्याने, अनुदान प्राप्त झाल्याच्या वर्षापासुन तीन वर्षापर्यंत अनुदान मागणीसाठी विद्यापीठाकडे अर्ज सादर करु नये.

५) पुस्तके सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असली तरी पुस्तकांची तीन वर्षापर्यंत जतन करण्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाच्या ग्रंथपालाची असणार आहे. या तीन वर्षामध्ये पुस्तकांची दुरुस्ती / बाईडिंग यावर येणारा खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे. या खर्च रक्कमेचे देयक मंजूर होणार नाही.

६) दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीस सदर योजनेची पुस्तके वाटप करण्यासाठी महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी योजनेची प्रसिध्दी / परिपत्रक प्रदर्शित करावे व इच्छूक विद्यार्थ्यांकडून अर्ज मागवावे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन आर्थिकदृष्टया मागासलेल्या गरीब, गरजू, व होतकरु विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करावे. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये पारदर्शकता ठेवावी म्हणजे तक्रारी येणार नाही. तद्नंतरही तक्रार आल्यास महाविद्यालय स्तरावर तक्रारीचे निराकरण करावे.

७) विद्यापीठ अनुदान प्राप्त पुस्तकांवर खालील मजकूराचा गोल शिक्का बनवून मारणे आवश्यक आहे. या पूस्तकांच्या वाटपासाठी स्वतंत्र नोंदणी पुस्तक ठेवावे. विद्यापीठाच्या विविध तपासणी समिती व अधिकाऱ्यांना सदर नोंदणी पुस्तक तपासण्याचे अधिकार असेल याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
पुस्तक पेढी योजना
विद्यार्थी कल्याण विभाग

८) पुस्तक पेढी योजनेचा लाभ खरोखरच्या गरजू विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी मा. अधिष्ठाता / प्राचार्य यांनी निरंतर संनियंत्रण ( Continuous Monitoring ) करणे आवश्यक आहे याची कृपया नोंद घ्यावी. तसेच सर्व सुचनांचे तंतोतत पालन करावे ही विनंती.

कृपया धनादेश मिळाल्याची पोहोच, उलट टपाली दयावी व योजनेतंर्गत दिलेल्या अनुदान रक्कमेच्या हिशोबाचे समायोजन करण्यासाठी पत्रात नमुद केलेप्रमाणे कागदपत्रांची एकत्रितरित्या पुर्तता करुन सदर पत्राच्या दिनांकापासुन दोन महिन्याच्या आत विद्यापीठास पाठविणे अनिवार्य आहे.

धन्यवाद !

आपला,

संचालक, विद्यार्थी कल्याण

Principal
S.S.S.P.M's College
of Nursing, Barshi

सोबत :- वरीलप्रमाणे

H:\covering letter schemes\book bank DD forward to College.doc

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi's

# COLLEGE OF NURSING, BARSHI.

Jagdale Mama Hospital Compound,
Karmveer Nagar Campus , Shivaji Nagar Barshi. - 413411
Dist.- Solapur.
☎ (02184) 228960, Fax - (02184) 226808, 228960
E mail Address : conbarshi @ rediffmail - com



Ref. No. CON / SSPM / 245 / 2012

Date : 20/10 /2012

प्रति,
**मा.संचालक,**
विद्यार्थी कल्याण,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

**विषय : पुस्तक पेढी योजना अनुदानाच्या रकमेचा हिशोब जमा करणेबाबत.**
संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/७५७ब/१२ दिनांक २४/०७/२०१२

महोदय,

वरील संदर्भीय विषयास अनुसरून विनंती की, सन २०१२—१३ साठी विद्यापीठाने लागू केलेल्या पुस्तक पेढी योजने अंतर्गत आमच्या महाविद्यालयास रक्कम रू.२००००/— (अक्षरी रू. वीस हजार फक्त) बॅंक ऑफ महाराष्ट्र धनादेश क्र. २८६६४९ दिनांक १८/०७/२०१२ ने अनुदान प्राप्त झाले होते.

सदर अनुदानातून पुस्तक पेढी योजनेसाठी रक्कम रू. २०२११/— (अक्षरी रू. वीस हजार दोनशे अकरा फक्त) एवढया रकमेची पुस्तके खरेदी केलेली असनू सदर अनुदान रकमेच्या जमा खर्चाचा हिशोब सनदी लेखापालांकडून परिक्षण करून मुळ उपयोगीता प्रमाणपत्र आपणाकडे पाठवित आहोत. कृपया स्वीकार व्हावा, ही विनंती.

कळावे,

O/C

आपली विश्वासू,

Principal
S.S.S.P.M's College
of Nursing, Barshi.

**सोबत :**

१. खरेदी केलेल्या पुस्तकाचे मुळ देयके
२. दरपत्रके
३. उपयोगीता प्रमाणपत्र
४. प्राचार्यांचे प्रमाणपत्र

23/10/12
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
Mhasrul, Vani-Dindori Road, Nashik - 422 004.

Principal
S.S.S.P.M's College
of Nursing Barshi

Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi's

# COLLEGE OF NURSING, BARSHI.

Jagdale Mama Hospital Compound,
Karmveer Nagar Campus , Shivaji Nagar Barshi. - 413411
Dist.- Solapur.
☎ (02184) 228960, Fax - (02184) 226808, 228960
E mail Address : conbarshi @ rediffmail - com



Ref. No. CON / SSPM / 244 / 2012 Date 20 / 10 /2012

## प्रमाणपत्र

सदर पुस्तके विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाच्या दृष्टीने उपयुक्त असून त्यांचे गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येईल.

O/C

SHRI SHIVAJI SHIKSHAN PRASARAK MANDAL ★ College of Nursing Barshi.

Principal
S.S.S.P.M's College
of Nursing, Barshi.

Principal
S.S.S.P.M's College
of Nursing, Barshi.